**Published on 9th April 2023**
**Prahar (Marathi)**

Print Link - https://clientportal.conceptbiu.com/mv/ad/2051-231183335-2051

# जागतिक आरोग्य दिन : लुपिन ह्यूमन वेल्फेअर ॲण्ड रिसर्च फाऊंडेशनतर्फे कार्यक्रम संपन्न

◆ **पालघर (प्रतिनिधी) :**



जागतिक आरोग्य दिनाचे औचित्त साधत लुपिन ह्यूमन वेल्फेअर ॲण्ड रिसर्च फाऊंडेशन व ग्रामीण रुग्णालय पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. यात मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग, दमा व सीओपीडी या रुग्णांच्या तपासण्या करण्यात आल्या व रुग्णांना मोफत औषधे वितरित करण्यात आली. यावेळी असंसर्गजन्य, तीस वर्षांवरील रुग्णांच्या तपासण्या केल्या गेल्या.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी तुषारा शंकर, लुपिन लिमिटेड तारापूरचे व्यवस्थापक भूपेंद्र घरत, वेंकटेश शेटे, डॉ. बाबासाहेब बनसोडे त्याचबरोबर सार्वजनिक आरोग्य विभागाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय बोदाडे, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. साळुंके, वैद्यकीय अधिकारी डा. मुलाने व पालघर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीप्ती गायकवाड हे उपस्थित होते.

लुपिन फाऊंडेशनच्या माध्यमातून पालघर जिल्ह्यात सीव्हीडी, सीओपीडी व अस्थमा या रुग्णांवरती आरोग्य विभागाच्या साहाय्याने पुढील पाच वर्षांकरिता कार्यक्रम हाती घेतल्याने याचा फायदा लोकांना होणार आहे, असे मत लुपिन फाऊंडेशनचे सीएसआर प्रमुख तुषारा शंकर यांनी मांडले.

दरवर्षी ७ एप्रिल हा दिवस 'जागतिक आरोग्य दिन' म्हणून साजरा केला जातो. १९४८ साली जागतिक आरोग्य दिनाची सुरुवात करण्यात आली. यास आज ७५ वर्षे पूर्ण होत असून, दरवर्षी आरोग्यविषयक बाबींवर लक्ष वेधण्यासाठी घोषवाक्य असते. यंदाच्या आरोग्य दिनाचा संकल्प 'सर्वांसाठी समान आरोग्यसुविधा, सर्वांसाठी आरोग्य!' असा आहे.

लुपिन ह्यूमन वेल्फेअर ॲण्ड रिसर्च फाऊंडेशन-२०१४ सालापासून सामाजिक कामात अग्रेसर असून, समाजाला आपण काही देणे लागतो, या उदात्त हेतूने ग्रामीण भागातील गरीब लोकांना मोफत रुग्णसेवा मिळावी म्हणून कार्यरत आहे तसेच पर्यावरण व निसर्ग संवर्धनासाठी लुपिन फाऊंडेशनचे कार्य प्रशंसनीय आहे.

कोरोना काळात लुपिन फाऊंडेशनच्या वतीने टिमा हॉस्पिटलला कोविड झालेल्या रुग्णांकरिता बेड, अत्यावश्यक ऑक्सिजन सिलिंडर, डायलिसिस मशीन व औषधे देऊन भरीव मदत करण्यात आली होती, तर आपलं दायित्व जाणून कोरोना काळात सुरू करण्यात आलेल्या ट्रेनमध्ये प्रवाशांना जेवण, पाण्याची भरपूर मदत या फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आली होती.